NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026
YEAR : 50) 1st July 2025 ( No. of Pages 04 ) ( No : 11

*सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्त्याग्रस्त अमरावती विभागातील जिल्ह्यांचा सिंचन अनुशेष कमी झाला नसून तो मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे : २*

# सर्वात जास्त 'सिंचन-अनुशेष' असलेल्या जिल्ह्यांप्रति राज्यकर्त्यांचे अशोभनीय वर्तन

**- प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**"Backlog of Amravati and Washim districts is liquidated by June 2024"**
***राज्यकर्त्यांची ही अधिकृत भूमिका सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्त्याग्रस्त जिल्ह्यांप्रति अत्यंत अशोभनीय वर्तन होय असे ठामपणे म्हणता येईल.*** *(परिच्छेद २२ पहा)*

**२१.** "सिंचन अनुशेषाने त्रस्त व शेतकरी आत्महत्त्याग्रस्त अमरावती महसूल विभागातील काही जिल्ह्यांचा सिंचन अनुशेष पूर्णपणे संपुष्टात आलेला आहे अशी एक जोरदार अफवा पसरली असून महाराष्ट्र शासनातील काही उच्च पदस्थ अधिकारी ही अफवा पसरविण्यात पुढाकार घेत असल्याचे दिसून येते. अमरावती व वाशिम जिल्ह्याचा अनुशेष पूर्णपणे संपुष्टात आलेला आहे अशी एक उपअफवा त्यांत अंतर्भूत आहे." असे मी या लेखाच्या पहिल्या परिच्छेदात नमूद केले होते. *(पृष्ठ १२९ पहा)*

**२२.** ही केवळ अफवा नसून ती राज्यशासनाची अधिकृत भूमिका आहे हे आता स्पष्ट झालेले आहे. राज्याच्या मा.मुख्यसचिवांनी दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी एक शपथपत्र (Affidavit) मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सादर केले असून या शपथपत्राच्या परिच्छेद ५ मध्ये **"Backlog of Amravati and Washim districts is liquidated by June 2024" असे नमूद केलेले आहे. राज्यकर्त्यांची ही अधिकृत भूमिका सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्त्याग्रस्त जिल्ह्यांप्रति अत्यंत अशोभनीय वर्तन होय असे ठामपणे म्हणता येईल.**

**२३.** हे जिल्हे जलसिंचन अनुशेष मुक्त झालेले आहेत असे प्रतिपादन करीत असताना "जलसिंचन अनुशेष मुक्तता म्हणजे काय?" हे लक्षात घ्यावे लागेल. "जलसिंचन अनुशेष" या शब्दाची व्याख्या कोणाच्या मर्जीवर किंवा लहरीवर अवलंबून राहिलेली नाही तर महाराष्ट्रामध्ये निश्चित अर्थ असलेली संज्ञा म्हणून स्थिर झालेली आहे. सत्यशोधन समितीच्या अहवालाने सर्वप्रथम ते ठरवून दिलेले आहे. "**अद्ययावत राज्य सरासरी पेक्षा जास्त किंवा निदान राज्यसरासरी इतकी सिंचनक्षमता ज्या दिवशी पदरी पडते त्याच दिवशी तो जिल्हा अनुशेषमुक्त होतो**" अशी ही व्याखा सत्यशोधन समितीच्या अहवालाने ठरवून दिलेली आहे. अनुशेष व निर्देशांक समितीने ती व्याख्या जशीच्या तशी मान्य करून त्याप्रमाणे जलसिंचन अनुशेष निश्चित केलेला आहे. अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल राज्य मंत्रिमंडळाने मान्य केला असून तसा शासननिर्णयसुद्धा दिनांक ५ डिसेंबर २००१ रोजी निर्गमित झालेला आहे. आता तर ही व्याख्या कायद्याचा भाग बनलेली असून ती जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्याच्या कलम २०(१) (ख) मध्ये नमूद आहे आणि यापेक्षा दुसरी कोणतीही व्याख्या आज अस्तित्वात नाही.

### भौतिक अनुशेष

**२४.** आता ही व्याख्या लक्षात घेता देशाचे माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी निश्चित करून दिलेल्या सहा महत्तम सिंचन अनुशेषग्रस्त जिल्ह्यांचा अनुशेष नष्ट होणे तर दुरच राहिले पण कितीतरी पटीने तो वाढलेला आहे हे स्पष्ट होईल. डॉ.मनमोहन सिंग यांनी प्रत्यक्ष विदर्भाला भेट देऊन या सहा जिल्ह्यांसाठी २१७७ कोटी रुपयांचा निधी केंद्रशासनातर्फे त्यावेळी उपलब्ध करून दिला होता. असे असतांना आता या अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील अनुशेष संपुष्टात आलेला आहे हे म्हणणे किती लबाडीचे आहे याचा आढावा पुढील परिच्छेदातून घेतलेला आहे. राज्यसरासरीवर येण्यासाठी जेवढ्या हेक्टरची सिंचनक्षमता त्या जिल्ह्यात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे तेवढ्या हेक्टरचा त्या जिल्ह्याचा अनुशेष निश्चित होतो. यालाच हेक्टरातील (भौतिक) अनुशेष म्हटले जाते. या जिल्ह्यांचा भौतिक अनुशेष परिच्छेद ८ मध्ये नमूद केलेला आहे. त्यामुळे त्याची पुनरुक्ती करण्याची आवश्यकता नाही.

### आर्थिक अनुशेष

**२५.** एकदा भौतिक अनुशेष (हेक्टरात) निश्चित झाला की, तो अनुशेष दूर करण्यासाठी लागणाऱ्या रकमेला 'आर्थिक अनुशेष' असे संबोधिले जाते. असा अनुशेष काढण्याची जबाबदारीसुद्धा कायद्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविलेली आहे. प्राधिकरणाच्या या अहवालाच्या जोडपत्र २(३) मधील स्तंभ ९ मध्ये अनुशेष दूर करण्याची प्रति हेक्टरी किंमत २,०२,८८६ एवढी पाटबंधारे विभागाने दाखविलेली आहे. सत्यशोधन समितीचा अहवाल दाखल झाला त्यावेळेला ही रक्कम प्रतिहेक्टर १० हजार रुपये होती. अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल तयार झाला त्यावेळेला ही रक्कम ५० हजार रुपये प्रति हेक्टरी होती. आता प्राधिकरणाचा २०२०-२१ चा अहवाल सादर करीत असतांना प्रति हेक्टरी अनुशेष दूर करण्यासाठीची रक्कम ही २,०२,८८६ रुपये इतकी पाटबंधारे विभागाने अधिकृतपणे सांगितली आहे. त्यामुळे आर्थिक अनुशेष कितीतरी पटीने वाढला आहे. त्याबाबतची रुपयात

***अमरावती जिल्ह्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा अनुशेष रुपयामध्ये १३४ कोटी रुपयाचा होता. आता अधिकृत आकडेवारीनुसार २०२० च्या सरासरीवर तो ५८०४ कोटी रुपये (अक्षरी पाच हजार आठशे चार कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ४३ पटीहून जास्त वाढलेला आहे.*** *(परिच्छेद २६ पहा)*

***अमरावती महसुल विभागाचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष ४१७ कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार २१५४० कोटी रुपये (अक्षरी एकवीस हजार पाचशे चाळीस कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ५१ पटीहून जास्त वाढलेला आहे.*** *(परिच्छेद ३२ पहा)*

अधिकृत आकडेवारी या अहवालाच्या जोडपत्र २(३) च्या स्तंभ ९ मध्ये नमूद आहे. *(पृष्ठ १३० पहा)*

**२६. अमरावती जिल्ह्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा अनुशेष रुपयामध्ये १३४.३३ कोटी रुपयाचा होता. आता अधिकृत आकडेवारीनुसार २०२० च्या सरासरीवर तो ५८०४ कोटी रुपये (अक्षरी पाच हजार आठशे चार कोटी रुपये)झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ४३ पटीहून जास्त वाढलेला आहे.**

**२७. अकोला (वाशिमसह) जिल्ह्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा अनुशेष रुपयामध्ये ९२.३३ कोटी रुपयाचा होता. आता अधिकृत आकडेवारीनुसार तो ६१४६ कोटी रुपये (अक्षरी सहा हजार एकशे शेचाळीस कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ६६ पटीहून जास्त वाढलेला आहे.**

**२८. ज्या वाशिम जिल्ह्याचा अनुशेष संपुष्टात आलेला आहे असे मुख्य सचिव म्हणतात त्या वेगळ्या वाशिम जिल्ह्याचा जून २०२० च्या स्तरावरील अधिकृत आकडेवारीनुसार २६०१ कोटी रुपयांचा (अक्षरी दोन हजार सहाशे एक कोटी रुपये) आर्थिक अनुशेष आहे.**

**२९.** बुलढाणा जिल्ह्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष ८४.७८ कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार ५०९६ कोटी रुपये (अक्षरी पाच हजार शहाण्णव कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ६० पटीहून जास्त वाढलेला आहे.

**३०.** यवतमाळ जिल्ह्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष १०५.४१ कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार ४४९२ कोटी रुपये (अक्षरी चार हजार चारशे ब्याण्णव कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ४२ पटीहून जास्त वाढलेला आहे.

**३१. वर्धा जिल्ह्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष ४३.८९ कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार ९९१ कोटी रुपये (अक्षरी नऊशे एक्याण्णव कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष २३ पटीहून जास्त वाढलेला आहे.**

**३२. अमरावती महसुल विभागाचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष ४१७ कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार २१५४० कोटी रुपये (अक्षरी एकवीस हजार पाचशे चाळीस कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ५१ पटीहून जास्त वाढलेला आहे.**

**३३. औरंगाबाद (मराठवाडा) या महसुली विभागाचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष २६०.६७ कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार १२५१८ कोटी रुपये (अक्षरी बारा हजार पाचशे अठरा कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ४८ पटीहून जास्त वाढलेला आहे.**

**३४.** भारतीय संविधानातील कलम ३७१ (२) हे आजही संविधानामध्ये कायम आहे. "महाराष्ट्र राज्याच्या तीनही विभागांमध्ये विकास खर्चासाठी पैशांचे समन्यायानुसार वाटप करण्यात यावे" अशी स्पष्ट तरतूद त्या कलमात आहे. या कलमान्वये भारताच्या मा.राष्ट्रपतींनी राज्यपालांना अधिकार दिल्यानंतर त्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांनी दिनांक १५ डिसेंबर २००१ रोजी निदेश (*13H834*) दिले. त्या निदेशातील परिच्छेद ९ (१) नुसार दिलेल्या निधी वाटपाच्या धोरणाचे बरोबर पालन केले असते तर अनुशेष आतापावेतो संपुष्टात आला असता. पण याबाबतचे मा.राज्यपालांचे निदेश पूर्णपणे धुडकावून गेल्या १० वर्षात विपरित निधी वाटपाचा सपाटाच लागल्याचे आपल्याला दिसून येते.

**३५.** मा.विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळाने अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल मान्य केला व मंत्रिमंडळाचा हा निर्णय दिनांक ५ सप्टेंबर २००१ रोजी शासननिर्णय निर्गमित करून जाहीर करण्यात आला. "**या समितीने काढलेला अनुशेष दूर करण्यासाठी कारवाई करण्यात यावी व अनुशेष दूर करीत असताना नवीन अनुशेष निर्माण होणार नाही याची काळजी घेण्यात यावी**" असे स्पष्ट आदेश मंत्रिमंडळाने या शासननिर्णयाद्वारे निर्गमित केले होते. मात्र त्याची सुद्धा गेल्या १० वर्षात अवहेलना करण्यात आली. त्यामुळे या अनुशेषग्रस्त जिल्ह्यात सिंचन अभावाने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या सतत आत्महत्त्या झालेल्या आहेत व त्यात सतत वाढ होत आहे असे स्पष्टपणे दिसून येते. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख, तत्कालीन पाटबंधारे मंत्री श्री.अजित पवार व तत्कालीन पाटबंधारे राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी एका जलसिंचन अनुशेषग्रस्त जिल्ह्यामध्ये एकाच दिवशी एकाच वेळी १९ जलसिंचन प्रकल्पांचा सामुहिक भूमिपुजन समारंभ पार पाडला होता. त्या सर्व प्रकल्पांना निधी उपलब्ध करून दिला होता व प्रत्यक्ष काम सुरू केले होते. आजच्या मुख्यमंत्र्यांनी, पाटबंधारे मंत्र्यांनी किंवा राज्यमंत्र्यांनी एखाद्या तरी अनुशेषग्रस्त जिल्ह्यामध्ये एखाद्या तरी सिंचन प्रकल्पाचे भूमिपुजन पार पाडले असेल तर त्याचा शोध घ्यावा लागेल.

**३६.** शेतकऱ्यांच्याकडे विकृत भावनेने पाहण्याच्या राज्यकर्त्यांच्या वृत्तीचे प्रदर्शन माजी मंत्री आणि सत्ताधारी पक्षाचे एक नेते श्री.बबनराव लोणीकर यांच्या एका जाहीर उद्‌गारातून समोर आलेले आहे. ते म्हणाले "त्याच्या मायचा पगार, त्याचा बापाचा पगार या लोणीकरने केला. त्याच्या बापाला पेरणीसाठी ६ हजार रुपये मोदींनी दिले. तुझ्या मायच्या, बहिणीच्या व बायकोच्या नावावर लाडकी बहीण योजनेचे पैसे आले. तुझ्या अंगावरचे कपडे, बूट व चप्पल आमच्यामुळेच आहेत. तुझा मोबाईलदेखील आमच्यामुळेच आहे. आमचेच पैसे घेता आणि आमच्यावर तंगड्या वर करता." शेतकऱ्यांच्या दुर्दशेकडे पाहण्याच्या राज्यकर्त्यांच्या विकृत मनोवृत्तीचे प्रतिनिधित्व हे उद्‌गार करतात, कोणी बोलतं, कोणी न बोलता करतं. लोणीकर म्हणाले की, "माझी काही चूक झाली नाही" पण "तरीही माफी मागतो." याच राज्यकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कृषीमंत्र्यांनी शेतकऱ्यांविषयी काढलेले उद्‌गार राज्यकर्त्यांच्या धोरणाचे प्रतिनिधित्व करतात. बबनराव लोणीकरांना कोणीतरी हे सांगायला पाहिजे होते की, बियाणे, खते, कीटकनाशके कंपन्यांनी ठरविलेल्या भावासह सरकारला GST देऊन शेतकरी खरेदी करतो. फवारणी, राखणी, पेरणी इत्यादी कामासाठीचा खर्च शासकीय धोरणांमुळे मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्याची स्वतःची व कुटुंबाची मेहनत याला तर काही मोलच नाही. शिवाय त्यांनी उत्पादन केलेला माल शासनकृपेने दलालांच्या घशात जातो. या मार्गाने त्याची मोठी लूट होण्यास शासन आणि फक्त शासन जबाबदार असते.

**३७.** काही महत्त्वाच्या गरजा भागविण्यासाठी राज्याला अनेकदा कर्ज काढावे लागते. "Handbook of Statistics on Indian States" या रिझर्व्ह बँकेने प्रकाशित केलेल्या सन २०२१-२२ च्या प्रकाशनामध्ये ३१ मार्च २०१३ रोजी महाराष्ट्रावर असलेले कर्ज २.८२ लक्ष कोटी रुपये होते व तेच ३१ मार्च २०२२ रोजी ६.०९ लक्ष कोटी रुपये झाले असे दिसून येते. म्हणजे जवळ जवळ तिप्पट झालेले होते. प्रत्येक वर्षी कर्जाची रक्कम वाढतच गेलेली आहे हे या हॅन्डबुकमधील आकडेवारीवरून दिसून येते. वर्षवार हे कर्ज कसे वाढत गेले याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत. :-

**Debt position of the Government of Maharashtra**
**(i.e. Outstanding Liabilities)**

| As at end March | Rs. in Crores |
|---|---|
| 1 | 2 |
| 2013 | 2,82,010 |
| 2014 | 3,09,327 |
| 2015 | 3,21,806 |
| 2016 | 3,51,441 |
| 2017 | 3,96,001 |
| 2018 | 4,32,479 |
| 2019 | 4,38,842 |
| 2020 | 4,80,955 |
| 2021 | 5,30,310 |
| 2022 | 6,09,000 |

***अकोला (वाशिमसह) जिल्ह्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा अनुशेष रुपयामध्ये ९२ कोटी रुपयाचा होता. आता अधिकृत आकडेवारीनुसार तो ६१४६ कोटी रुपये (अक्षरी सहा हजार एकशे शेचाळीस कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ६६ पटीहून जास्त वाढलेला आहे.*** *(परिच्छेद २७ पहा)*

सन २०२२ नंतर २०२५ पर्यंत हे कर्ज वाढतच गेले असून आज ते ९ लक्ष कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. सिंचन सुविधांच्या अभावी एकाच पिकावर अवलंबून असलेल्या व कर्जाखाली दबल्याने आत्महत्त्येच्या मार्गाने वळणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती लक्षात घेऊन राज्याने काढलेल्या ९ लक्ष कोटीच्या कर्जापैकी निम्मे कर्ज जरी या कामी लावले असते तर ही दैन्यावस्था संपुष्टात आली असती. कर्जाची सर्व रक्कम श्रीमंतांची आणखी समृद्धी वाढविण्याच्याच कामी लावणे राज्यकर्त्यांसाठी अशोभनीय होय.

**३८.** केंद्रसरकारने २०१९ मध्ये कंपन्यांवर बसवावयाच्या करामध्ये फार मोठ्या प्रमाणात कपात केली. कर कायदा १९६१ अन्वये कंपन्यांवरील करामध्ये ३० टक्क्यांवरून कपात करून तो २२ टक्के करण्यात आला. **कंपन्यांवरील करामधे ही जी कपात करण्यात आली त्याचा परिणाम शासनाचे उत्पन्न फार मोठ्या प्रमाणात कमी झाले व त्यासोबतच कंपन्यांना मिळणारा नफा (Profit) फार मोठ्या प्रमाणात वाढला. दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी संसदेच्या अंदाज समितीने (Parliamentary Committee on Estimates) जो आपला अहवाल संसदेला सादर केला त्या अहवालामध्ये शासनाला किती नुकसान सहन करावे लागले याचे तपशील नमूद करण्यात आलेले आहेत.**

"The corporate tax cut of 2019 had resulted in a negative "revenue impact" of Rs. 1.84 lakh crore in FY20 and FY21, alone – Rs. 87,835.75 crore in FY20 and Rs. 96,399.74 crore in FY21."

**कंपनी करावरील जे उत्पन्न आर्थिक वर्ष २०२० मध्ये ५,५६,८७६ कोटी रुपये होते ते २०२१ मध्ये ४,५७,७१९ कोटी रुपयांवर आले.**

जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यांचा अनुशेष अनेक पटींनी वाढतो आहे याची जाणीव असलेल्या महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना कंपन्यावरील करकपात एक वर्ष उशिराने करा, त्या एक वर्षाचा निधी महाराष्ट्राला उपलब्ध करून दिल्यास आत्महत्त्यांच्या प्रमाणात मोठी घट होईल अशी विनंती केंद्रशासनाला करता आली असती. मोठमोठ्या कंपन्यांचा रोष होईल म्हणून अशी विनंती करण्याचे महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी टाळले असेल, पण फक्त या कामासाठी केंद्राचा वेगळा निधी तत्कालीन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी जसा उपलब्ध करून दिला होता तसा या जिल्ह्यांसाठी केंद्राचा वेगळा निधी उपलब्ध करून द्या अशी विनंती करता आली असती पण तसे राज्यसरकारने केले नाही.

**३९.** भारतीय संविधानातील कलम ३७१ (२) कडे आजचे राज्यकर्ते पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहेत ही वस्तुस्थिती वर मांडलेली आहे. आता खरे म्हणजे जेव्हा मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निणर्यांची राज्यशासनाचा उच्च शिक्षण विभाग अवहेलना करीत आहे ही गोष्ट विद्यमान राज्यकर्त्यांच्या लक्षात आणून दिल्यावरसुद्धा ते काहीच कारवाई करीत नाहीत अशा वेळी घटनेतील एका कलमाकडे ते दुर्लक्ष करतात याबद्दलचे रडगाणे निरर्थक आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक ७ जुलै २०२४ रोजीच्या बैठकीत एक ठराव करून (*182/24*) मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अनेक प्रकरणांमध्ये उच्च शिक्षण विभागातील अधिकारी अवहेलना करतात ही बाब मा.मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली होती. मी स्वतः मा.मुख्यमंत्र्यांना दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी एक निवेदन सादर करून अशा निरनिराळ्या १९ बाबी लक्षात आणून दिल्या होत्या. या निवेदनाच्या प्रती मी दोनही मा.उपमुख्यमंत्र्यांना सादर केल्या होत्या. मात्र यातील एकाही बाबीवर आजपर्यंत निर्णय होऊ शकला नाही. अनुशेषाने त्रस्त व आत्महत्त्यांनी ग्रस्त शेतकऱ्यांचे काय घेऊन बसलात. तक्रारकर्त्यांशी चर्चाच करावयाची नाही असा जणू काही या राज्यकर्त्यांनी धोरणात्मक निर्णयच घेतलेला आहे.

**३९.१** अर्थात श्री.उदय सामंत हे मा.मंत्री या बाबीला अपवाद म्हणून नमूद करता येतील. त्या काळात ते उच्च शिक्षण विभागाचे मंत्री होते. बेकायदेशीरपणे ७१ दिवसांचे वेतन कापून घेतल्याच्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर अधिकारी कोणतीही कारवाई करीत नव्हते. शिक्षकांना आपल्या भोवती फिरवावे व त्यांनी आपल्याशी अर्थपूर्ण चर्चा करावी यापेक्षा दुसरा कोणताही हेतू त्या अधिकाऱ्यांचा नव्हता. शिक्षक आपल्या जाळ्यात सापडत नाहीत असे वाटल्यावर अधिकाऱ्यांनी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेले. **"ही SLP सर्वोच्च न्यायालयात येण्याच्या लायकीची नाही" अशा स्पष्ट शब्दात मा.सर्वोच्च न्यायालयाने ती SLP 'डिसमिस' केली.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने उच्च शिक्षणमंत्र्यांना एक निवेदन दिले व ही बाब व सोबतच इतर प्रलंबित बाबी त्यांच्या लक्षात आणून दिल्या. त्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी बोलाविले. विषय समजून घेतला व निश्चित तारखेला ७१ दिवसांचे वेतन अदा करण्याबाबतच्या न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल असे सांगितले. आता मंत्र्यांच्या पातळीवर निर्णय झालेलाच आहे तेव्हा त्याबाबतचा शासननिर्णय काढण्यापूर्वी पूजाअर्चा, गुरूदक्षिणा याचा काही कार्यक्रम पार पाडता येऊ शकतो काय? या कामी उच्च शिक्षण विभागातील अधिकारी जोरात भिडले. पण आपल्या जाळ्यात कोणीही अडकत नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी ठरलेल्या तारखेला शासननिर्णय काढावयाचा नाही असे ठरवून टाकले. जेणेकरून टाकलेल्या जाळ्यात आणखी काही दिवस मासे गळाला लागण्याची शक्यता आजमावता येईल.

**३९.२** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ही गोष्ट मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.उदय सामंत यांच्या लक्षात आणून दिल्यावर त्यांनी अत्यंत कडक भूमिका घेतली त्यामुळे उच्च शिक्षण विभाग हादरून गेला. ठरवून दिलेल्या तारखेच्या दिवशी सकाळी त्यांनी उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना "आज शासननिर्णय निघाला नाही तर तुम्हाला त्याचे परिणाम भोगावे लागतील" अशी दटावणी दिली. त्याचा परिणाम असा झाला की, ठरलेल्या तारखेला उच्च शिक्षण विभागाने एकाच विषयावर दोन शासननिर्णय निर्गमित केले. (१) पहिला शासननिर्णय हा चार परिच्छेदांचा असून दुसरा शासननिर्णय हा पाच परिच्छेदांचा आहे. (२) पहिला शासननिर्णय हा तीन पृष्ठांचा असून दुसरा शासननिर्णय चार पृष्ठांचा आहे. (३) पहिला शासननिर्णय हा समाजमाध्यमांवर (Twitter, WhatsApp) प्रसिद्ध झाला तर दुसरा शासननिर्णय हा शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) प्रसिद्ध झाला. (४) पहिला शासननिर्णय प्राधिकृत अधिकाऱ्याने पारंपरिक स्वाक्षरी करून काढलेला आहे, तर दुसरा शासननिर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढलेला आहे. (५) "**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**" हा घटनात्मक औपचारिकता पूर्ण करणारा महत्त्वपूर्ण उल्लेख पहिल्या शासननिर्णयामध्ये चौथ्या परिच्छेदानंतर असून दुसऱ्या शासननिर्णयामध्ये तो पाचव्या परिच्छेदानंतर आहे. (६) पहिल्या शासननिर्णयावर ७ डिसेंबर २०२० ही तारीख टाकण्यात आली असून तो शासननिर्णय त्याच तारखेला निर्गमित करण्यात आलेला आहे. दुसऱ्या शासननिर्णयावर प्राधिकृत अधिकाऱ्याची डिजीटल स्वाक्षरी हीच मुळात ८ डिसेंबर २०२० रोजी ११ वाजून २७ मिनिटे व ४४ सेकंदानी झाल्याचे डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेल्या मजकुरामध्ये नमूद आहे. मात्र तरीही त्यावर शासननिर्णय निर्गमित केल्याची तारीख ७ डिसेंबर २०२० टाकलेली आहे.

**३९.३** या सर्व खटाटोपामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला खूपच आटापिटा करावा लागला हे खरे असले तरी त्यामुळे ठरलेल्या तारखेला शासननिर्णय काढण्याचे आश्वासन श्री.उदय सामंत यांनी पूर्ण केले हे जाहीरपणे नमूद केले

***वर्धा जिल्ह्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष ४३ कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार ९९१ कोटी रुपये (अक्षरी नऊशे एक्याण्णव कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष २३ पटीहून जास्त वाढलेला आहे.*** *(परिच्छेद ३१ पहा)*

***ज्या वाशिम जिल्ह्याचा अनुशेष संपुष्टात आलेला आहे असे मुख्य सचिव म्हणतात त्या वेगळ्या वाशिम जिल्ह्याचा जून २०२० च्या स्तरावरील अधिकृत आकडेवारीनुसार २६०१ कोटी रुपयांचा (अक्षरी दोन हजार सहाशे एक कोटी रुपये) आर्थिक अनुशेष आहे.*** *(परिच्छेद २८ पहा)*

पाहिजे. हेही नमूद केले पाहिजे की, ते त्यावेळी या मंत्रिमंडळाचे नव्हे तर पूर्वीच्या मंत्रिमंडळाचे सदस्य होते. **एकाच विषयावर एकाच दिवशी उच्च शिक्षण विभागाने दोन शासननिर्णय काढल्याचे माझ्या माहितीतील गेल्या ३०-४० वर्षातील हे एकमेव उदाहरण होय.**

**४०.** येथे हे नमूद केले पाहिजे की, मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची राज्यकर्ते अवहेलना करीत असतील तर सुसंघटित संघटनेच्या नेतृत्त्वाखाली काम करणाऱ्या सुशिक्षित लोकांना आंदोलनाचा पर्याय उपलब्ध असतो तसेच न्यायनिवाड्याचा मार्गसुद्धा उपलब्ध असतो. अनेक बाबतीत अवमान याचिका दाखल करण्यात आल्या असून काही बाबतीत निर्णयसुद्धा झालेले आहेत.

सिंचन अनुशेषाने ग्रस्त असलेल्या, निसर्गाच्या कृपेवर वर्षातून कसे तरी एक पीक काढताना कर्जाच्या बोझ्याखाली दबल्यामुळे आत्महत्त्येच्या विचारांच्या जवळ पोहचलेला शेतकऱ्यांचा समूह कोर्टकचेरी करू शकत नाही किंवा राज्यकर्त्यांच्या नाकी दम येईल एवढे मोठे आंदोलन करू शकत नाही. तो काय करू शकतो तर आमच्या पंतप्रधानांना डॉ.मनमोहन सिंगाचे हृदय दे, आमच्या मुख्यमंत्र्यांना विलासराव देशमुखांचे हृदय दे अशी फक्त प्रार्थना करू शकतो. ही प्रार्थनासुद्धा कोणी ऐकत नाही हे लक्षात आल्यावर तो आत्महत्त्या करण्याच्या मार्गाकडे वळतो. निर्दयी राज्यकर्त्यांच्या राजवटीत हा कार्यक्रम वर्षानुवर्षे असाच चालू राहतो.

**४१.** प्रत्येक मोजमापाच्या वेळी कोल्हापूर जिल्हा हा महत्तम सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेला क्रमांक एकचा जिल्हा आहे हे मी वेळोवेळी नमूद केलेले आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कामानिमित्त एकदा मी कोल्हापूरला दोन-तीन दिवस मुक्कामी होतो. संघटनेतील माझे ज्येष्ठ सहकारी प्रा.संभाजीराव जाधव यांना "मी महत्तम जलसिंचन अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील प्रतिनिधी आहे, मला असे सांगा की, तुमच्या जिल्ह्यामध्ये ही एवढी सिंचनक्षमता कशी पदरी पडली?" त्यांनी मला असे सांगितले की, "अहो बी.टी.! आमच्या भागामध्ये सिंचनाविषयी लोकांच्या मनामध्ये नुसती गोडी आहे असे नव्हे तर अतिशय कष्टपूर्वक व मेहनतीने एकापेक्षा जास्त पिके काढण्यासाठी या सिंचनक्षमतेचा ते वापर करतात. लोकांना ही गोडी लागण्याचे कारण म्हणजे **छत्रपती शाहू महाराजांच्या काळापासून त्यांनी याबाबतीत केलेली वैचारिक बांधणी हे होय. नैसर्गिक साधनसंपत्ती आपण चांगल्या प्रकारे वापरली पाहिजे. शेती उत्पादन वाढवावयाचे असेल तर शेतीला पाण्याची जोड मिळणे आवश्यक आहे. यासाठी दुष्काळात छोट्या-मोठ्या तलावांची बांधणी करणे, जुने तलाव दुरूस्त करून नवीन तलाव बांधणे, कच्च्या व पक्क्या विहिरी तयार करणे इत्यादी सुधारणा तर महाराजांनी केल्याच होत्या, पण त्यासाठी एक दीर्घकालीन योजनाही त्यांनी कार्यवाहीत आणली. ही योजना म्हणजे राधानगरी धरण होय. या धरणाची सुरुवात त्यांच्याच काळात झालेली.** प्रकल्पांच्या बांधकामासाठी लोक उत्तम सहकार्य करतात...तुमच्याकडे लोक धरणाला विरोध करतात असे आम्ही वाचतो. धरणाला विरोध म्हणून राज्याच्या मुख्यमंत्र्यांला रस्ता पेटवून दिल्यामुळे वरूड वरून बडनेऱ्याला जाऊन मेल पकडता आली नाही व नागपूर वरून विमानाने मुंबईला यावे लागले" हे वृत्तपत्रात वाचल्यावर आमच्याकडील लोकांना आश्चर्य वाटते."

**४२.** प्रा.संभाजीराव जाधव यांच्यासोबत एका पुनर्वसित गावाला भेट दिली असता तेथे भूसंपादन कायद्याने जी किंमत ठरलेली असेल त्याच्यापेक्षा ६२ टक्के जादा रक्कम शेतकऱ्यांना देण्याविषयीचा सरळ खरेदीचा शासननिर्णय मला त्या गावात मिळाला. अमरावतीला परत आल्यावर पेढी प्रकल्पग्रस्तांच्या सभेत सरळ खरेदीचा तो शासननिर्णय व त्यामुळे मिळणारा वाढीव मोबदला या बाबी जेव्हा मी समजावून सांगितल्या तेव्हा सरळ पद्धतीने जमिनी खरेदी करून देण्यासाठी निबंधकाच्या नोंदणी कार्यालयामध्ये शेतकऱ्यांच्या रांगा लागल्या. तोपर्यंत सरळ खरेदीचा प्रकार विदर्भात ठाऊक नव्हता. पेढी प्रकल्पानंतर तो सर्वत्र वापरल्या गेला.

**४३.** महत्तम सिंचनक्षमता पदरात पाडून घेऊन कष्टपूर्वक व मेहनतीने स्वतःला व आपल्या भागाला समृद्ध करणाऱ्या या शेतकऱ्यांवर नवीनच संकट कोसळलेले आहे. एखाद्या कंत्राटदाराच्या समृद्धीसाठी शेकडो एकरची सुपीक जमीन शक्तीपीठ मार्गासाठी जोरजबरीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्या जात असून त्या विरोधात हे सारे शेतकरी आंदोलनात उतरलेले आहेत. दूरचित्रवाहिन्यांवरून आंदोलकांचा हा आक्रोश पाहवत नाही. एक आंदोलक ओरडून सांगत आहे की, "अरे! हा शक्तीपीठ महामार्ग रद्द करा. तेवढ्या पैशात विदर्भातील जलसिंचन अनुशेष दूर होतो. त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या तरी थांबतील." दुसरा एक आंदोलक आक्रोश करीत होता की, "तुम्ही आमच्या सिंचनाखालील सुपीक जमिनी जबरदस्तीने हिसकावून घेत आहात. आमच्या उपजिवीकेचे उत्तम साधन नष्ट करीत आहात. उद्या आम्हाला आत्महत्त्या करण्याशिवाय कोणताही मार्ग शिल्लक राहणार नाही." या आंदोलकांचे हे उद्गार ऐकून अंतकरण पिळवटून जात होते. **बहु अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील आत्महत्त्यांचे प्रमाण कमी करण्याचे 'पुण्य' ज्या राज्यकर्त्यांना पदरी पाडून घेता आले नाही त्या राज्यकर्त्यांच्या पदरी उत्तम सुपीक जमिनी बळकावल्यामुळे एखाद्या शेतकऱ्यावर आत्महत्त्या करण्याची वेळ यावी हे 'पाप' तरी पडू नये याची त्या राज्यकर्त्यांनी काळजी घ्यावी.**

***औरंगाबाद (मराठवाडा) या महसुली विभागाचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष २६० कोटी रुपयाचा होता तो आता अधिकृत आकडेवारीनुसार १२५१८ कोटी रुपये (अक्षरी बारा हजार पाचशे अठरा कोटी रुपये) झालेला आहे. म्हणजे मूळ आर्थिक अनुशेष ४८ पटीहून जास्त वाढलेला आहे.*** *(परिच्छेद ३३ पहा)*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr.Mahendra V. Mete, 38, Ganediwal Layout, Camp, Amravati-444602. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade, 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 01.07.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.07.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,.........................................................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................